# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.12.2024** **वारःशनिवार**

---

1. भारतीय राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त लोकसभेत विशेष चर्चेला प्रारंभ
2. येत्या चार पाच वर्षात राज्याची अर्थव्यवस्था 1 लाख कोटींची करण्याचं उद्दीष्ट पूर्ण करू-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
3. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन आणि
4. बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेत ब्रिस्बेन इथं आजपासून तिसरा सामना

**संसद**

भारतीय राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त काल लोकसभेत राज्यघटनेबाबत विशेष चर्चा घेण्यात आली. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांचा साकल्याने विचार करत भारतीय राज्यघटनेने राष्ट्र उभारणीचा मार्ग प्रशस्त केला आहे असं या चर्चेला सुरुवात करताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले. आपली राज्यघटना म्हणजे देशाच्या नागरी मूल्यांचा आरसा आहे. घटना समितीनं तयार केलेला हा मसूदा केवळ एक सरकारी दस्तावेज नाही तर ते लोकांच्या आकांक्षेचं प्रतिबिंब आहे असं राजनाथ सिंह म्हणाले. सरकार, घटनेत नमूद केलेल्या राजधर्मानुसारच काम करत आहे. राज्यघटना निर्मितीत अनेक महान नेत्यांचं योगदान आहे असं सांगून मदन मोहन मालवीय, लाला लजपतराय, भगत सिंग, वीर सावरकर अशा अनेक नेत्यांचे विचार राज्यघटनेला समृद्ध करतात असं राजनाथ सिंग म्हणाले. राज्यघटना हे नागरिकांची सुरक्षितता, न्याय, एकता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं अस्त्र आहे असं मत काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वड्रा यांनी या चर्चेत व्यक्त केलं. राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा आहे असं समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव चर्चेत भाग घेताना म्हणाले. या सभागृहात पुन्हा 75 वर्षांनी घटनेवर चर्चा होत असल्याचं ते म्हणाले. लोकसभेत दोन दिवस राज्यघटनेवर चर्चा होणार आहे. दरम्यान, राज्यसभेत कालही उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्यावरील अविश्वास प्रस्तावावरुन सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात गदारोळ झाला. पावणेबारा वाजता सभागृहाचं कामकाज तहकूब करण्याआधी, या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी अध्यक्षांनी विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि सभागृहाचे सत्ताधारी पक्षाचे नेते जे. पी. नड्‌डा यांना चर्चेसाठी आपल्या दालनात बोलावलं.

**मुख्यमंत्री**

महाराष्ट्र हे देशातलं सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी राज्यात विविध विकास धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचं सांगून 2028 ते 2030 पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था 1 लाख कोटींची करण्याचं उद्दीष्ट पूर्ण करू असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. जागतिक हिंदू आर्थिक

परिषदेचं उद्घाटन काल मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. हरित ऊर्जा, नदीजोड प्रकल्प यातून शाश्वत विकासावर राज्य शासन भर देत आहे असं मुख्यमंत्री म्हणाले.

हिंदू समाजाची संकल्पना ही एकमेकांना पूरक ठरत जगण्याची असून इथे सर्वांना समान संधी आहे. याउलट पाश्चात्या संस्कृती जो बलशाली तोच टिकेल या संकल्पनेवर आधारित आहे असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. यावेळी आमदार मंगलप्रभात लोढा, जागतिक हिंदू आर्थिक मंचाचे संस्थापक स्वामी विद्यानंद यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. तीन दिवसांच्या या परिषदेत विविध क्षेत्रातले जगभरातले प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**<u>मुख्यसचिव</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्य सचिव म्हणून मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना तत्काळ पदभार स्वीकारण्यास सांगण्यात आलं आहे. अश्विनी भिडे या 1995 च्या तुकडीच्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या अधिकारी आहेत.

**<u>मुख्यमंत्री गुकेश शुभेच्छा</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल बुद्धीबळ विश्वविजेता डी. गुकेश याच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधला. गुकेशचं अभिनंदन करुन त्यांनी भविष्यातल्या यशासाठी गुकेशला शुभेच्छा दिल्या. तसंच मुख्यमंत्र्यांनी गुकेशला महाराष्ट्रातर्फे सत्कार स्वीकारण्याचं आमंत्रणही दिलं.

**<u>ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे-गुकेश</u>**

भारताच्या गुकेश दोम्माराजू यानं जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत नुकतीच ऐतिहासिक कामगिरी केली. गुकेश सर्वात कमी वयात बुद्धीबळाचा जगज्जेता ठरला आहे. विश्वनाथन आनंद यांच्यानंतर भारताला दुसरं जगज्जेतेपद मिळवून देणाऱ्या गुकेशची कामगिरी आणि भविष्यातली वाटचाल याविषयी ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांनी आकाशवाणीशी संवाद साधला......

**<u>पुस्तक महोत्सव</u>**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज संध्याकाळी होणार आहे. उद्घाटन सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार चंद्रकांत पाटील, यांच्यासह नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, कार्यक्रमाचे संयोजक राजेश पांडे यांची मुख्य उपस्थिती असेल. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुढचे आठ दिवस हा महोत्सव रंगणार आहे.

**<u>साखर कामगाराचा संप मागे</u>**

वेतनवाढीसह अन्य मागण्यांसाठी राज्यातील दीड लाख साखर कामगारांनी 16 डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला होता; मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने राज्य सरकारने वेतनवाढीसाठी त्रिपक्षीय समितीची तातडीने स्थापना केली आहे. यामुळे राज्यातील साखर कामगारांनी संप दोन महिन्यांसाठी स्थगित केला आहे, अशी माहिती साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे

दिली. राज्याच्या कामगार विभागानं वेतनवाढीसह अन्य प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी साखर संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तीन घटकांच्या प्रतिनिधींची त्रिपक्षीय समितीची स्थापना शासन निर्णयाद्वारे केली, असं काळे यांनी सांगितलं.

**महिला आयोग-रत्नागिरी**

महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळावा, यासाठी राबवल्या जाणाऱ्या महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमा अंतर्गत येत्या बुधवारी सकाळी रत्नागिरीत जनसुनावणी होणार आहे. जिल्ह्यातल्या महिलांनी न घाबरता पुढे येऊन आपल्या तक्रारी या जनसुनावणीत मांडाव्यात, असं आवाहन महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी केलं आहे. या जनसुनावणीला पोलिस, प्रशासन, सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक आदी उपस्थित असल्याने तक्रारींवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे आपली कैफियत मांडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याचं काम आयोगाकडून केलं जातं, असं चाकणकर यांनी सांगितलं.

**वायूगळती-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यात जयगड इथं झालेल्या वायुगळती प्रकरणाच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती आमदार उदय सामंत यांनी काल दिली. त्यांनी रुग्णालयात दाखल विद्यार्थ्यांची भेटही घेतली.

**आरोग्य तपासणी-हिंगोली**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात नुकतंच आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. यामध्ये नवजात बालकांपासून 18 वर्षांपर्यंतच्या वयोगटातील 130 संदर्भित हृदयरुग्णांची टुडी इको तपासणी करण्यात आली. यापैकी 20 विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करणं आवश्यक असून महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना आणि आरबीएसके कार्यक्रमा अंतर्गत या शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत.

**क्षयरोग मुक्तग्राम पंचायत-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या निवड झालेल्या 73 पैकी 70 ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या आहेत. या ग्रामपंचायतींचा नुकताच जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सिंधुदुर्गनगरी इथं एका विशेष कार्यक्रमात गौरव करण्यात आला. सर्वांच्या प्रयत्नातून सिंधुदुर्ग जिल्हा क्षयरोग मुक्त करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी यावेळी केलं.

**दत्तजयंती-सांगली**

सांगली जिल्ह्यात पलूस तालुक्यातील औदुंबरसह राज्यभरातील दत्त मंदिरांमध्ये आज दत्त जयंतीनिमित्त काकड आरती आणि मंगलआरती, अभिषेक, महापूजा, नैवेद्य, महाआरती, महाप्रसाद तसंच दत्तगुरूंच्या जन्माचं कीर्तन, सायंकाळी जन्मकाळ, रात्री धुपारती, पालखी, मंत्रपुष्पांजली करुणा त्रिपादी इत्यादि कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांदरम्यान, बॉर्डर गावस्कर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेत ब्रिस्बेन इथं आज सुरु झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पावसाच्या व्यत्ययानंतर आतापर्यंत ऑस्ट्रेलियाच्या 24 धावा झाल्या आहेत. दोन्ही संघांनी पाच सामन्यांच्या या मालिकेतला एकेक सामना जिंकला आहे. 2021 मध्ये याच मैदानावर ऑस्ट्रेलियावर तीन गडी राखून मिळवलेल्या विजयाची भारत पुनरावृत्ती करू शकेल का हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात पुन्हा थंडीचा कडाका जाणवत असून विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत घट झाली आहे. काल सर्वात कमी किमान तापमान 8 पूर्णांक 9 दशांश सेल्सिअस जळगांव इथं नोंदवलं गेलं. आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**